**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**

**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६००४**

**इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी सन २०२३-२४ साठी वार्षिक नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी बाबतचे परिपत्रक**

परिपत्रक क्रमांक कोविमं/लेखा/नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वर्गणी/ ------ दिनांक ३१/०५/२०२३ /1449

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,

सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,

सातारा/सांगली/कोल्हापूर

कोल्हापूर विभागीय मंडळ कार्यालयाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षासाठी नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | नोंदणी शुल्क | शिक्षण संक्रमण वर्गणी |
|---|---|---|---|
| १) | **इयत्ता १० वी साठी ००१ ते १०० विद्यार्थी** | **रू. १०००/-** | |
| | **१०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यामागे** | **रू. २००/-** | **रू. ५००/-** |
| २) | **इयत्ता १२ वी साठी ००१ ते १०० विद्यार्थी** | **रू. १०००/-** | |
| | **१०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यामागे** | **रू. ४००/-** | **रू. ५००/-** |

मंडळाच्या मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रत्येक महिन्याचे किमान २ अंकांचे वार्षिक वर्गणीदार होणे बंधनकारक करण्यात आले आहे. तरी उपरोक्तप्रमाणे नोंदणी शुल्क विभागीय मंडळाकडून देण्यात आलेल्या चलनाद्वारे भरावे व **शिक्षण संक्रमण दोन अंकांची वार्षिक वर्गणी राज्य मंडळ यांचे एचडीएफसी बँक खातेवर भरावी.** विभागीय मंडळाकडून देण्यात आलेल्या चलनाद्वारे नोंदणी शुल्क व **राज्य मंडळ यांचे एचडीएफसी बँक खातेवर शिक्षण संक्रमण वर्गणी** जमा करताना सोबतची इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी ॲडव्हाईस नोट या कार्यालयाच्या शाखा लेखाकडे पाठविणे आवश्यक आहे. दिनांक १० ऑगस्ट २०२३ नंतर पाठविल्या जाणाऱ्या नोंदणी शुल्कासाठी शाळांना/कनिष्ठ महाविद्यालयांना खालीलप्रमाणे दंडासहीत नोंदणी शुल्क आकारण्यात येईल यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात आलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| १) दिनांक ११ ऑगस्ट ते दिनांक ३१ ऑगस्ट | रू. २००/- |
| २) दिनांक ०१ सप्टेंबर ते दिनांक ३० सप्टेंबर | रू. ३००/- |
| ३) दिनांक ०१ ऑक्टोबर नंतर नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखेपर्यंत | रू. ५००/- |

सदर नोंदणी शुल्क आपल्या नजीकच्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेत विभागीय मंडळाकडील चलनाने भरावी. चलन भरताना चलनातील रिसिट कोड क्र.०५ (इयत्ता १० वी साठी) व रिसिट कोड क्र.६२ (इ.१२ वी साठी) अशी ✓ खुण करून अचूक रक्कम अंकी व अक्षरी भरावी. व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी राज्य मंडळ यांचे एचडीएफसी खातेवर बँकेतील साधे (पांढरे) चलनाने भरावी. नोंदणी शुल्काची (Copy for Divisional Board) चलन व शिक्षण संक्रमण अंकाची वर्गणी राज्य मंडळ यांचे खातेवर भरलेली चलन तसेच ॲडव्हाईस नोट आपल्या प्रतिनिधीमार्फत कार्यालयाकडे त्वरीत जमा करावी. कोणत्याही परिस्थितीत डी.डी. स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सबब, राज्य मंडळ यांचे शिक्षण संक्रमणाबाबतचे परिपत्रक विभागीय मंडळाच्या संकेतस्थळावर दिनांक ३१/०५/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे. शिक्षण संक्रमण अंकाची वार्षिक वर्गणी राज्य मंडळ यांचे एचडीएफसी बँक खातेवर भरावी. एचडीएफसी बँकेचा सविस्तर तपशील पुढील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **BANK NAME -** | **HDFC BANK** |
| **TYPE OF A/C -** | **SAVING ACCOUNT** |
| **BRANCH NAME-** | **BHANDARKAR ROAD,PUNE-5** |
| **A/C NO. -** | **50100205419942** |
| **IFSC CODE -** | **HDFC0000007** |

**तसेच नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण वार्षिक वर्गणी यापुढे प्रतिवर्षी दिनांक १० ऑगस्ट पूर्वी भरावी. याबाबत या विभागीय मंडळाकडून परिपत्रक पाठविले जाणार नाही. नोंदणी शुल्क किंवा विलंब शुल्क किंवा शिक्षण संक्रमण वर्गणीमध्ये काही बदल झाल्यास त्याबाबत मंडळाकडून वेळोवेळी कळविण्यात येईल. तरी त्याप्रमाणे आपल्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क वर्गणी मंडळाच्या परिपत्रकाची वाट न पाहता प्रतिवर्षी न चुकता दिनांक १० ऑगस्टपूर्वी भरावी.**

विभागीय सचिव,

कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

टीप: मागील बाजूस नमुने दिले आहेत त्या नमुन्यात माहिती पाठवावी.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर ४१६००४

इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी ॲडव्हाईस नोट नोंदणी शुल्काकरिता
शाळा/कनिष्ठ महाविद्यालय शाळा सांकेतांक क्रमांक | | | | | | | |

दिनांक: / /२०२३

प्रति,

मा.विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

महोदय,

आमच्या शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण खाली नमूद केल्याप्रमाणे आपल्या कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहे.

१) विद्यार्थी संख्या [ ]

२) नोंदणी शुल्क चलन क्रमांक ---------------------------- दिनांक -------------------------- रक्कम रू.--------------/-

३) शिक्षण संक्रमण शुल्क चलन क्रमांक -------------------दिनांक --------------------------- रक्कम रू.--------------/-

४) बँकेचे नाव व शाखा ------------------------------------------

५) विलंब शुल्क (दंड)

अ) दिनांक ११ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट रू.२००/-
ब) दिनांक ०१ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर रू.३००/-
क) दिनांक ०१ ऑक्टोबर नंतर नियमित विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखेपर्यंत रू.५००/-

आपला विश्वासू,

मुख्याध्यापक/प्राचार्य स्वाक्षरी
(शिक्क्यासह)